| | |
|---|---|
| | फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३६/२०२६<br>अक्षय विलास गायकवाड **वि.** महाराष्ट्र सरकार<br>सी.एन.आर.क्रमांक–एम.एच.एस.टी.१६०००५३०२०२६ |

**<u>निशाणी १ वरील आदेश</u>**

**( दिनांक २९/०६/२०२६ रोजी पारीत )**

अर्जदाराने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ अन्वये वाई पोलिस ठाण्याच्या गु.र.नं.४४/२०२६, भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यात जप्त असलेली काळ्या रंगाची बजाज कंपनीची सी.टी.१२५ एक्स मॉडेलची ही दुचाकी गाडी असून तिचा नं. एम.एच-११-डी.के-३५९७ चेसिस क्रमांक MD2B85BX6NWJI8464, इंजिन नं. DYXWNJ66206 ही सुपुर्तनाम्यावर मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे. अर्जाचे अवलोकन केले व त्यावरील तपास अधिकाऱ्याचे म्हणणे ( निशाणी क्र.०५ ) वाचले, तसेच विद्वान शासकीय अभियोक्ता यांचे म्हणणे वाचले आणि दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले.

२. अभियोग पक्षानुसार आरोपीकडून काळ्या रंगाची बजाज कंपनीची सी.टी.१२५ एक्स मॉडेलची ही दुचाकी गाडी असून तिचा नं. एम.एच-११-डी.के-३५९७ चेसिस क्रमांक MD2B85BX6NWJI8464, इंजिन नं. DYXWNJ66206 ही जप्त करण्यात आलेली आहे आणि भारतीय न्याय संहितेच्या कलम कलम ३०३(२) अन्वये वाई पोलिस ठाण्यात गु.रं.नं.४४/२०२६ नोंदविण्यात आला. अर्जदाराने दाखल केलेल्या निशाणी क्र.३ वरील दस्तऐवज यादीत त्याचे वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्राची सत्यापित छायांकित प्रत, तसेच त्याच्या आधारकार्डाची व प्रथम खबर अहवालाची सत्यापित छायांकित प्रत दाखल केलेली आहे. प्रस्तुत मोटारसायकल ही वाई पोलिस ठाण्यात धुळ खात पडून आहे. अभिलेखावर दाखल दस्तऐवजानुसार प्रकरणात अर्जदार हे मालक असून, जप्त केलेली मोटारसायकल पोलीस ठाण्यात जमा आहे. सदर मोटार सायकलचा वापर होणे आवश्यक आहे अन्यथा त्याचे मूल्य कमी होते. तसेच सदर मोटार सायकलचे इंजिन, टायर,

रंग व इतर पाट्‌र्स पडून राहिल्याने खराब होऊन ते निकामी होण्याची दाट शक्यता आहे. प्रकरणात जप्त केलेल्या मोटारसायकलचे योग्य ते छायाचित्र आणि योग्य पंचनामा तयार केल्यास अभियोजनाचे उद्देश साध्य होवु शकते. म्हणून प्रकरणाच्या या स्तरावर जप्त मुद्देमालाचा तात्पुरता ताबा अर्जदारास देण्यास कोणताही अडथळा नाही. म्हणून अटी व शर्तींच्या आधारे खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) प्रमाणेच्या वाई पोलीस ठाण्याच्या गु.र.नं.४४/२०२६ या गुन्ह्यात जप्त असलेली काळ्या रंगाची बजाज कंपनीची सी.टी.१२५एक्स मॉडेलची मोटारसायकल नं. एम.एच-११-डी.के-३५९७ चेसिस क्रमांक MD2B85BX6NWJI8464, इंजिन नं. DYXWNJ66206 अर्जदाराकडून रक्कम रुपये ५०,०००/–चे हमीबंधपत्र घेऊन त्याला सुपुर्तनाम्यावर परत करण्यात यावी.

२. प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत अर्जदाराने वर नमूद मोटारसायकलचे स्वरुप बदलु नये किंवा तृतीय पक्षाचे हितसंबंध प्रस्थापित करु नये.

३. न्यायालय म्हणेल त्या त्या वेळी अर्जदाराने संबंधित मुद्देमाल न्यायालयासमक्ष हजर करावा.

४. तपास अधिकारी यांनी अर्जदाराच्या खर्चाने जप्त मोटारसायकलचचे छायाचित्र घेवुन छायाचित्रावर अर्जदाराची स्वाक्षरी घ्यावी व योग्य पंचनामा तयार करुन आरोपपत्रासह न्यायालयात दाखल करावे.

५. आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

६. प्रकरणातील दस्तऐवज नस्तीबध्द करण्यात येतात.

NILESH RAVINDRA YALMANE

Digitally signed by NILESH RAVINDRA YALMANE
Date: 2026.06.29 11:01:30 +0530

वाई. ( निलेश र. यलमाने )

दि.२९/०६/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वाई.

**प्रमाणपत्र**

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मूळ आदेशा – प्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघूलेखकाचे नांव. | : | सुमंत दत्तात्रय वर्णेकर.<br>लघूलेखक श्रेणी - ३. |
| न्यायालयाचे नाव | : | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वाई, (न्यायालय क्र.२), ता.वाई, जि.सातारा. |
| आदेश जाहीर केल्याची तारीख | : | २९/०६/२०२६. |
| आदेशावर न्यायाधीशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | २९/०६/२०२६. |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : | २९/०६/२०२६. |